दिनांक २० सप्टेंबर २०१९ रोजी भूगोल विभागात भूगोल विषयातील संशोधन पध्दती याविषयावर व्याख्यान आयोजित केले. याप्रसंगी प्रा. डॉ. व्ही.जे.पाटील व प्रा. डॉ. पी.डी. पाटील या तज्ज्ञ प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. पी.डी.पाटील यांनी भूगोल विषयातील संशोधनाच्या विविध संधी व वेगवेगळया क्षेत्रातील होणारे बदल व लागणारे मनुष्यबळ पाहता भूगोलातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधी याविषयी मार्गदर्शन केले. तर प्रा. व्ही.जे.पाटील यांनी संशोधन पध्दतीत होत जाणारे बदल, संशोधनाचे क्षेत्र, संशोधनाच्या पायऱ्या व आवश्यक कौशल्य याविषयी मार्गदर्शन केले.










